# The Stalwarts

विश्व स्वधर्म सूर्ये पाहो



# लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय

यवतमाळ ४४५००१ (महाराष्ट्र)


संपादक मंडळ

प्राचार्य डॉ. दुर्गेश कुंटे

प्रोफेसर डॉ. कविता तातेड

सह.प्रा.डॉ. संतोषकुमार गाजले

प्रा. सौरभ वगारे



Vidyawarta

www.vidyawarta.com

International Multilingual Research Journal

Principal

...Arts, Science & Commerce College,

Andur Tal. Tuljapur Dist. ...

# INDEX

01) लोकनायक बापूजी अणे यांचे सामाजिक कार्यातील योगदानाचे पुनरावलोकन.. डॉ. दुर्गेश कुंटे, यवतमाळ ||08

02) The Invincible Lion Of Revolution - Rash Bihari Bose
Assistant Professor Santosh Bhaskarao Gore, Yavatmal ||17

03) Newton of Library Science: Dr.S.R.Ranganathan
Dr. Rajshri Vivek Dharmadhikari, Yavatmal ||39

04) Gandhism in Raja Rao's 'Kanthapura'
Prof. Prashant S. Jawade, Kalamb ||45

05) Actions Speak louder than words -Sudha Murthy
Dr.Prachi Sharad Patharkar, Washim ||51

06) Contribution of Rabindranath Tagore in Literature
Dr.Dinesh A. Gundawar, Dist- Yavatmal (M.S.) ||59

07) Developing character profile of appealing hockey player
Dhanraj Pillay...DR. SUHAS D. YADAV (M.S.) ||67

08) Non-Violence: Gandhi's Way of Life Revealed through his
Writing....G.B.Mane, Babhulgaon ||80

09) Stalwarts of Modern India A. D. Shroff- (Architect of Free
enterprise and ... Dr Shruti R Panday ||86

10) Sri Aurobindo's Nationalism through his Poetic Works
Prof. S. P. Mohod, Yavatmal ||96

11) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि अस्पृश्य हक्क लढा
प्रा.डॉ.सुनिल रजपूत, जि.उस्मानाबाद ||101

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

Scanned with CamScanner

11

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि अस्पृश्य् हक्क् लढा

प्रा.डॉ.सुनिल रजपूत
सहयोगी प्राध्यापक,
जवाहर महाविद्यालय, अणदूर,
ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

============**********============

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या हक्कासाठी अत्यंत तीव्र स्वरुपाचा संघर्ष केल्याचे सर्वांनाच ज्ञात आहे. त्यासाठी त्यांना महात्मा गांधीसारख्या महामानवाशी संघर्ष करावा लागला. अनेकांची टोकाची टीका सहन करावी लागली. देशद्रोहीपणाच्या व ब्रिटीश सत्तेचे समर्थक अशा प्रकारच्या आरोपांनाही सामोरे जावे लागले. परंतु अस्पृश्यांच्या उद्धारासाठी प्रयत्न् करीत असताना हिंदू समाजाला व राष्ट्राला घातक ठरेल असे काही करण्याचे त्यांनी हेतूपूर्वक टाळले.

मानवी जीवनाला कलंक लावणाऱ्या अस्पृश्यतेच्या अनिष्ठ प्रथेचे उच्चाटन करण्याच्या कार्याला त्यांनी पूर्णपणे वाहून घेतले. अस्पृश्य् बांधवांना आपल्या नैसर्गिक हक्कासाठी संघर्ष करण्याची, वेळप्रसंगी अन्यायाचा प्रतिकार करण्याची भावना निर्माण केली. अस्पृश्यांविषयी डॉ.आंबेडकर म्हणतात की, अस्पृश्य् हे देखील या देशाचे नागरिक आहेत. म्हणून या देशावर इतरांप्रमाणे अस्पृश्यांचा देखील अधिकार आहे. अस्पृश्यांनी इतरांच्या मेहेरबानीवर व सहानूभूतीवर जगण्याचे काहीच कारण नाही. त्यांनी वरिष्ठ वर्गाची याचना करुन नव्हे तर अन्यायाविरुद्ध संघर्ष करुन आपले हक्क् मिळविले पाहिजेत.१

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad
Scanned with CamScanner

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या हक्कासाठी जो लढा उभारला त्याची सुरुवात महाड येथील चवदार तळ्याच्या २५ डिसेंबर १९२७ रोजीच्या सत्याग्रहाने केली. त्या सत्याग्रही लोकांच्या सभेत भाषण करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले की, हिंदू समाज समर्थ करावयाचा असेल, तर चातुरवर्ण्य आणि असमानता यांचे उच्चाटन करुन हिंदू समाजाची रचना एक वर्ण व समता या दोन तत्वांच्या पायावर केली पाहिजे. अस्पृश्यता निवारण्याचा मार्ग हा हिंदू समाज समर्थ करण्याच्या मार्गापासून भिन्न नाही म्हणून मी म्हणतो की, आपले कार्य जितके स्वःहिताचे आहे तितकेच राष्ट्रहिताचे आहे, यात काही किंतू नाही?२

याचा अर्थ असा होतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्य व्यक्तिसह समाजातील सर्व व्यक्तिमध्ये भावनात्मक ऐक्य निर्माण व्हावे असे वाटते.

**जातीव्यवस्थेचा व अस्पृश्यतेचा उगम व प्रसार :—** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी असे मत व्यक्त केले आहे की, जातीचा उगम म्हणजे जातीबाहेरील विवाहास बंदी करणाऱ्या यंत्रणेचा उगम तसेच त्यांनी असेही म्हटले आहे की, दोन विवाह योग्य भिन्न लिंगव्यक्ती मध्ये असलेली विषमता दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे ह्या भोवतीच जातीचा प्रश्न शेवटी फिरताना आढळून येतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मतानुसार जात हा आंतरविवाही समूह आहे. आंतरविवाहाच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी जातीव्यवस्था निर्माण झाली. आंतरविवाह पद्धत समाजात रुजविण्यासाठी व त्या पद्धतीचे निर्धारण करण्यासाठी अथवा दृढीकरण करण्यासाठी जी यंत्रणा हेतूपूर्वक समाजावर लादण्यात आली, त्या पद्धतीमध्ये जातीव्यवस्थेचा उगम पहावयास मिळतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील जाती या आपल्या प्रबंधात असे म्हटले आहे की, आंतरविवाह पद्धत हेच जातीव्यवस्थेचे एकमेव वैशिष्ट्य आहे. जातीव्यवस्थेचा उगम समजावून घेणे म्हणजे, आंतरजातीय विवाह पद्धतीचा उगम समजावून घेणे होय.३

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

Scanned with CamScanner

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे हे विचार भिन्न व स्वतंत्र स्वरूपाचे आहेत. प्रारंभीच्या काळात हिंदू समाजात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र असे चार वर्ण होते. हे वर्ण गुणांवर आधारीत होते, व्यक्तिला आपल्या गुणाच्या जोरावर वर्ण बदलता येत होता. पण पुढे काळाच्या ओघात ब्राम्हणांनी आपल्या वर्गाचे रूपांतर बंदिस्त वर्गात म्हणजेच जातीत केले, पुढे ब्राम्हणांचे अनुकरण इतर वर्गांनी केल्यामुळे भारतात असंख्य जाती व उपजातींचा उगम झाला.

ज्या अस्पृश्यतेच्या भयानक समस्यामुळे भारतातील दलितांना गुलामगिरी पेक्षाही अत्यंत वाईट जीवन जगावे लागले ती अस्पृश्यता केंव्हा व कोणत्या कारणामुळे उदयास आली हा एक मोठा गुढ प्रश्न आहे. याबाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपले स्वतंत्र विचार अस्पृश्य (अनटचेबलस) या आपल्या ग्रंथात व्यक्त् केले आहेत.

अस्पृश्यतेच्या उदयासंबंधी ज्या अनेक विचारवंतांनी विचार मांडले त्यापैकी स्टेन्ले राईस हा एक होता. त्याच्या मते, अस्पृश्य हे अनार्य व द्रविडेतर आदिवासी होते. त्यांना द्रविडांनी जिंकून आपल्या अंकीत केले. अस्पृश्य् हे मुळतच आर्यांनी जिंकलेल्या वंशापैकी नव्हते. स्टेन्ले राईसच्या मतानुसार वंश आणि व्यवसाय यातच अस्पृश्यतेचे उगमस्थान होते. म्हणजे द्रविडांनी ज्या अनार्यांना पराभूत केले होते तेच पुढे अस्पृश्य् लोक म्हणून ओळखले जावू लागले. असा आपल्याला स्टेन्ले राईसच्या विवरणातून निष्कर्ष काढता येईल. परंतू स्टेन्ले राईसचे हे मत डॉ.आंबेडकरांनी खोडून काढताना म्हटले की, हे विचार यांत्रिकी स्वरुपाच्या तर्कावर आधारलेले आहेत. त्यामुळे ते आपल्याला ग्राह्य् मानता येणार नाहीत. याबाबत डॉ.आंबेडकरांनी असे म्हटले आहे की, मानववंशशास्त्रांच्या दृष्टीने केलेल्या संशोधनात महार आणि मराठे यांची कुळे एकच होती असे दिसुन आले आहे. हे साम्य् इतके मोठ्या प्रमाणावर होते की, महार आणि मराठे यांच्यात जी कुलनामे आढळून येतात या सर्वांचा विचार केल्यानंतर अस्पृश्यांच्या उगमासंबंधीचा वंश विषयकतेचा सिध्दांत हा त्याज्य् ठरतो.४

याचा अर्थ असा होतो की, वरिष्ठ अथवा श्रेष्ठ वंशाच्या

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

Scanned with CamScanner

लोकांनी कनिष्ठ अथवा हलक्या दर्जाच्या लोकांवर जे निरनिराळ्या कारणांमुळे निर्बंध लादले त्यातून अस्पृश्यतेचा उगम झाला हे विचार डॉ.आंबेडकरांना मान्य् नसल्याचे आपल्या निदर्शनास येतात. डॉ.आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या उगमासंबंधी असे म्हटले आहे की, ब्राम्हण धर्म आणि बौद्ध धर्म यांच्या झगड्यातून अस्पृश्यतेचा जन्म झाला.५

डॉ.आंबेडकरांचे हे अस्पृश्यतेच्या उगमासंबंधीचे विचार तर्कशुद्ध वाटतात. कारण ब्राम्हण धर्मीय लोक व बौद्ध धर्मीय यांच्यात जो संघर्ष निर्माण झाला होता, त्या संघर्षात बौद्ध धर्मीय लोकांना हार खावी लागली. आपल्या विरोधकांना कायमचे नेस्तनाबूत करण्याच्या उद्देशाने विजेत्या ब्राम्हण धर्मीय लोकांनी पराभूत बौद्ध धर्मीय लोकांवर अतिभयानक स्वरुपाचे निर्बंध लादण्याची शक्यता नाकारता येत नाही. या निर्बंधातूनच अस्पृश्यतेचा उगम झाला असला पाहिजे असे जे डॉ. आंबेडकरांना वाटते ते तर्कशास्त्रीय दृष्टीने विचार केल्यास चुकीचे वाटत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाच्या उध्दारासाठी जे महान कार्य केले त्याला इतिहासात तोड नाही. आपल्या अस्पृश्य् बांधवांना ते म्हणत की, तुम्ही हिंदू आहात तरी तुम्हास पाणी मिळत नाही, देवळात जाऊन देवाचे दर्शन घेता येत नाही आणि सार्वजनिक ठिकाणी स्वाभिमानाने बसता येत नाही. मुके प्राणी सुध्दा मंदिरात प्रवेश करतात पण अस्पृश्य् देवळात गेला की देव बाटतो. ही कल्पना माणूसकीला काळीमा फासणारी आहे. जर माणूस म्हणून जगायचे असेल तर यापुढे अन्याय सहन करता कामा नये. चवदार तळ्याचे पाणी पिल्यामुळे आपल्याला मुक्ती मिळणार नाही. मंदिरात प्रवेश मिळाल्यामुळे मोक्ष प्राप्ती होणार नाही, प्रश्न् आपल्या अस्तित्वाचा आहे. इतर जातीचे जे हक्क् व अधिकार आहेत ते तुम्हालासुध्दा मिळाले पाहिजेत आणि ते मिळवून देण्यासाठी माझा हा लढा आहे. हिंदू धर्मातील धर्मग्रंथ व ध र्मशास्त्र यांनी जातीव्यवस्था व अस्पृश्यतेचे समर्थन केले आहे. अशा हिंदू धर्मग्रंथावर आघात केल्याशिवाय अस्पृश्यता व जातीव्यवस्थेचे उच्चाटन होणार नाही. म्हणून आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

Scanned with CamScanner

मनुस्मृतीचे दहन केले.

अस्पृश्यांवर होणाऱ्या भयानक अत्याचाराची काही उदाहरणे : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांवर होणाऱ्या भयानक अत्याचाराची अनेक उदाहरणे आपल्या जातीचे निर्मूलन या ग्रंथात दिले आहेत. त्यापैकी काही उदाहरणांचा उल्लेख केला आहे.

१) पेशवाईत सार्वजनिक रस्त्यांवर सवर्ण हिंदूंच्या पुढे अस्पृश्यांना जाण्यास प्रतिबंध केला जात असे. जर अस्पृश्य समोर आला आणि त्याची सावली सवर्णांवर पडल्यास तो विटाळ मानला जाई. हे टाळण्यासाठी अस्पृश्यांवर तो प्रतिबंध लादण्यात आला होता. अस्पृश्यांना गळ्यात, मानेभोवती, मनगटावर काळा दोरा बांधणे बंधनकारक होते. कारण अशा दोऱ्यामुळे संबंधीत व्यक्ती ही अस्पृश्य् व्यक्ती आहे हे ओळखणे शक्य् होत असे. तसेच अस्पृश्यांना रस्त्यावरुन चालताना कमरेभोवती बांधलेल्या दोऱ्याला सुतळीच्या दुसऱ्या टोकास केरसुनी जोडावी लागत असे. तसेच गळ्यात गाडगे बांधावे लागत असे. कारण अस्पृश्य् व्क्ती रस्त्यावरुन जाताना जर थुंकली तर त्या थुंकीचा स्पर्श होऊन सवर्ण व्क्ति विटाळण्याची शक्यता होती. हे सर्व टाळण्यासाठी पेशव्यांच्या राजवटीत अस्पृश्यांवर उल्लेख केलेले अमानुष प्रकारचे निर्बंध लादण्यात आले होते.

२) गुजरातमधील कविर्धा या गावातील वरिष्ठ जातीच्या लोकांनी अस्पृश्यांनी आपली मुले सरकारी शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी पाठवू नये, असा अस्पृश्यांना आदेश दिला. म्हणजे शिक्षणापासून अस्पृश्यांच्या मुलांना हेतूपूर्वक वंचित ठेवण्याचा प्रयत्न् करुन अस्पृश्यांवर घोर अन्याय केल्याचे आपल्याला मान्य् करावे लागेल.

३) १९३५ च्या नोव्हेंबर महिन्यात अहमदाबाद जिल्ह्यातील ज्ञानू नावाच्या खेड्यत अस्पृश्यांवर अन्याय केला जात असे. विहिरीवर पाणी भरण्याच्या कारणावरुन अत्याचार केले जात होते.

अशा प्रकारच्या अनेक उदाहरणांवरुन सवर्ण हिंदू अस्पृश्यांना कशा प्रकारे त्रास देत होते हे स्पष्ट होते.

**सामाजिक सुधारणांची गरज :–**

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad.

Scanned with CamScanner

जातीव्यवस्थेचे व अस्पृश्यतेचे भयानक परिणाम लक्षात घेऊन ते दूर करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज कमी अधिक प्रमाणात सर्वच समाजसुधारकांना वाटत असल्याचे निदर्शनास येते. सामाजिक नैपुण्याशिवाय कोणत्याही क्षेत्रात प्रगती साध्य करता येणार नाही याची जाणीव सामाजिक सुधारकांना झालेली होती.

थोडक्यात आपणास असे म्हणता येईल की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते नसून ते संपूर्ण भारत देशाचे नेते होते. अस्पृश्यांच्या हिताची काळजी घेताना त्यांनी सदैव राष्ट्रहिताचाच विचार केला होता. त्यातूनच जातीव्यवस्थेचे आणि चातुर्वण्य पद्धतीचे उच्चाटन करुन सामर्थ्यवान भारतीय समाज व राष्ट्र निर्माण करण्यासाठी समाजात भावनात्मक ऐक्य निर्माण करण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली.

संदर्भसूची—

१) धुर्ये जी.एस., कास्ट क्लास अॅण्ड ऑक्युपेशन (इंग्रजी), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६१

२) संयोजक, पुणे विद्यापीठ विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठाकृत परिसंवाद, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार आणि कार्य ३ ऑगस्ट १९९०, पृ.क्र. ३०

३) Dr.Babasaheb Ambedkar, Writings & Speeches, Vol-I, Page No- 14, Education Department, Government of Maharashtra, 1979

४) डॉ.वा.ना.कुबेर, डॉ.आंबेडकर—विचार मंथन, प्रथम आवृत्ती १९७२, केसरी प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ४१

५) Dr.Ambedkar B.R.: Untouchables, Page No- 98

६) गर्गे स.मा. (संपा.), भारतीय समाज विज्ञान कोश, खंड ३ व ४, समाज विज्ञान मंडळ, पुणे १९९३

❑❑❑

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

Scanned with CamScanner